Fighters / Marathi

# योद्धे

## लेखक टोनी ॲलामो

योएल संदेष्ट्याच्या द्वारे देवाच्या आत्म्याने संदेश दिला आहे : ''तुमचे दास व दासी यांवरहि त्या समयी मी आपल्या आत्म्याचा वर्षाव करीन'' (योएल २:२९).

पौल आणि पेत्र ह्यांच्या काळात मंडळ्यांमध्ये शिक्षण देणे, संदेश देणे अगर बोलणे ही कामे करण्यास स्त्रियांना परवानगी नव्हती हे त्या दोघांनाही माहीत होते.[१] तथापि, काळाचा अंत जवळ येईल तेव्हा देवाने खास निवडलेल्या स्त्रिया संदेश देतील, उपदेश, प्रवचने करतील हेही ते जाणून होते.[२] जुन्या करारातील संदेष्टा योएल ह्याला देवाच्या आत्म्याने जो संदेश दिला होता, तोच त्याने पुन्हा नव्या करारामध्ये प्रेषित पेत्राच्या द्वारे दिला आहे - प्रेषित.२:१८ - ''आणखी त्या दिवसांत मी . . . आपल्या दासींवर आपल्या आत्म्याचा वर्षाव करीन म्हणजे ते/त्या संदेश देतील'' (सुवार्ता सांगतील)[३]. अखेरच्या काळाच्या संबंधी इशारा देणाऱ्या या दोन अतिमहत्त्वाच्या चिन्हांचे शिक्षण न देणारे, या सत्याचा आदर न करणारे ईश्वरविद्येचे पंडित देवाचे नाहीत तर सैतानाचे आहेत[४] आणि ते फसवणारे, खोटे संदेष्टे आहेत.[५]

माझी ख्रिस्तवासी पत्नी सुझन सुमारे पाच वर्षांची होती, तेव्हा ती क्षयरोगाने मरणाच्या दारात पडली होती. हा रोग तिला तिच्या वडिलांपासून झाला होता. आणि ते अमेरिकेच्या सैन्यात होते तेव्हा त्यांना हा रोग झाला व नुकतेच ते त्या रोगाने मरण पावले होते. डायर, अर्कन्सास या गावातील एका छोट्याशा घरात ती एका खोलीत बिछान्यावर पडून असे. या घराच्या समोर, रस्त्याच्या पलीकडे एक जुने गॅरेज होते. तेथे दररोज रात्री ख्रिस्ती लोक पवित्र आत्म्याने भरलेल्या ख्रिस्ती सभा घेत असत. तिचे आईवडील आध्यात्मिक अगर धार्मिक नव्हते, तरीपण सुवार्तेच्या वचनांचे उत्साही, उत्तेजन देणारे शब्द आणि संगीत सुझनला खूप आवडत. आपल्या बिछान्यावर पडून ती ते ऐकत असे.

समोर, रस्त्यापलीकडे राहणारी एक ख्रिस्ती स्त्री सुझनच्या घरी येई आणि आठवड्यात एक दोन वेळा सुझनच्या आईला घरकामात मदत करी. सुझनचे वडील सैन्यात होते म्हणून आता तिच्या आईला सरकारकडून दरमहा काही निवृत्तीवेतन मिळे. त्या पैशातून ती काही पैसे या मदतनीस बाईला देई.

एके दिवशी सुझनची खोली स्वच्छ करताना ती ख्रिस्ती स्त्री सुझनला म्हणाली, ''बाळ, येशूने तुला बरे करावे आणि तुझ्या आत्म्याचे तारण करावे म्हणून आम्ही प्रार्थना करीत आहोत.'' हे ऐकून सुझनला खूपच आनंद झाला.

१. १तीमथ्य.२:१२; १ करिंथ.१४:३५; २. प्रे.कृ.२:१८; ३. मूळ ॲरॅमिक. ४. २ तीमथ्य.४:२; यहे.३३:३-९; योएल २:१; योहान.१०:१२; ५. गलती.१:८-९; मत्तय.७:१५; १३:२१; २४:११,२४; योहान.१:५; प्रकटी.२:४; २२:१८

एका रात्री डॉक्टरांनी सुझनच्या आईला सांगितले, ''जिनेव्हा, तुझी मुलगी आजची रात्र काढील असं वाटत नाही.'' सुझनच्या आईला रडू कोसळले. ते सुझनने ऐकले. तिची आई म्हणत होती, ''मी तिला कशी सोडू, हे देवा, नको, नको. कृपा कर. देवा, तिला मरू देऊ नको.'' घरात तिची आजी आणि इतर लोक देखील रडू लागले. सुझन ते सर्व ऐकत होती. आणि ''आता माझे सारे उपाय थकले,'' हे डॉक्टरांचे शब्दही तिच्या कानी पडले.

आणि त्याच रात्री सुझनला दिसले की तिची खोली देवदूत आणि ढग यांनी भरली आहे. त्या ढगांमधून खिळ्यांचा वण असलेला एक हात पुढे आला आणि त्याने सुझनला स्पर्श केला; त्या क्षणीच तिला शक्ती आली, बरे वाटू लागले.

तिने कित्येक दिवस काहीच खाल्ले नव्हते. गावात फक्त तिच्या काकांचेच एकटे एक दुकान होते. सुझनला मुरांबा आणि डबाबंद मांस खावेसे वाटले म्हणून रातोरात ते दुकान उघडणे भाग पडले. तिची आजी म्हणाली, ''नको, नको. तिने हे खाता कामा नये. तिला ते चालणार नाही.'' सुझनची आई म्हणाली, ''असू दे, तिला जे हवं ते खाऊ दे. काहीही खाऊ दे. तिने बरेच दिवसांत काही खाल्लं नाही.'' मग दुकान उघडून सुझनला हवे होते ते पदार्थ आणून तिला दिले.

रस्त्यापलीकडे, जुन्या गॅरेजमध्ये जमणाऱ्या सर्व ख्रिस्ती लोकांचा आनंद गगनात मावेना. कारण सुझन बरी होणे हा एक चमत्कारच होता आणि ती अशी बरी झालेली पाहून गावातल्या सर्वांनी आणि आजूबाजूच्या गावांतील बऱ्याच लोकांनी प्रभू येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवला. आपला वैयक्तिक तारणारा म्हणून त्याचा अंतःकरणपूर्वक स्वीकार केला. त्यांच्यापैकी काही व्यक्ती अद्याप हयात आहेत. त्यांना या सर्व घटना अगदी चांगल्या आठवतात आणि ही वस्तुस्थिती अशीच आहे अशी साक्षही ते देतात.

काही दिवसांनंतर सुझनच्या नात्यातल्या एका मुलीचे लग्न झाले. तिने तिला म्हटले, ''माझ्याबरोबर चल, ओझार्क डोंगरातल्या आमच्या शेतावर काही दिवस येऊन राहा. हवापालट झाल्याने तुला आणखी बरे वाटेल.'' तिकडे शेतावर ताजे दूध व अंडी वगैरे भरपूर होते.

तिकडे सुझनच्या खोलीत भिंतीवर एक कॅलेंडर होते. कॅलेंडरवर एका लहान मुलीचे चित्र होते. या मुलीचे केस लांबसडक, सोनेरी होते. तिने अंगात पांढराशुभ्र पायघोळ झगा घातला होता. आणि वेगाने वाहणाऱ्या एका मोठ्या नदीच्या पात्रात बरोबर मध्यावर असलेल्या, खडकातून घडवलेल्या एका वधस्तंभाला घट्ट पकडून ती मुलगी कशीबशी उभी होती. तिने आपल्या दोन्ही हातांनी त्या वधस्तंभाला कवटाळले होते. भरवेगात वाहणारे नदीचे पाणी तिला आपल्या बरोबर ओढून खेचून नेत आहे असे वाटत होते. सुझनच्या बालमनाला वाटले की, चित्रातील ती मुलगी आपणच आहो आणि वेगाने वाहणारी नदी म्हणजे सैतानी बळ आहे. ते तिला ख्रिस्तापासून दूर, भ्रष्ट जगात[६] देवपित्यापासून दूर नेत आहे. आणि तो दगडी वधस्तंभ हाच एक तरणोपाय आहे. तेथेच तारण मिळेल असे तिला वाटले. ख्रिस्ताच्या द्वारे तारण साधायचे, आपला बचाव करून घ्यायचा हीच तिची एकच आशा होती. कारण ख्रिस्तानेच त्या

६. १ योहान.२:१६-१७;४:४-६;५:१९;८:२३; २पेत्र.१:४

जुनाट ओबडधोबड वधस्तंभावर तिच्यासाठी आपले प्राण अर्पण केले होते.[७] आणि मग अगदी स्वर्गात जाईपर्यंत त्यालाच चिकटून राहायचे हाच तिचा विचार होता.[८]

दररोज, दिवसा सुझन रानावनात फिरायला जाई आणि तेथे बसून प्रार्थना करी. ती केवळ पाचच वर्षांची होती, तरी आदामाच्या पापाचा कलंक आपल्या आत्म्याला लागला आहे हे ती कोणत्या तरी प्रकारे जाणून होती आणि त्या पापाचा कलंक प्रत्येकाच्याच आत्म्याला लागलेला आहे.[९] या बाबतीत तिच्या विवेकभावाची खातरी पटली होती.

एक दिवस सुझनने माझ्या आत्म्याचे तारण कर असे येशूला विनवून सांगितले. तेव्हा तिला देवाचा साक्षात्कार झाला आणि तो तिने उघड्या डोळ्यांनी पाहिला. ख्रिस्त मेघामधून स्वर्गापासून खाली येत आहे असे तिने पाहिले. त्याने अंगात रक्तवर्ण पोषाख घातला होता.[१०] आणि त्याच्या भोवती अनेकरंगी मेघधनुष्य होते.[११] ते रंग या पृथ्वीत कोठेही दिसणार नाहीत असे ती म्हणाली. ख्रिस्त स्वर्गातून खाली उतरून येत असताना त्याने तिला स्पष्टपणे दाखवले की, अगदी शेवटल्या काळात तो पृथ्वीवर पुन्हा परत येण्यापूर्वी ती (सुझन) जगाला त्याची सुवार्ता सांगेल.

येशूने तिला अनेक वेगवेगळी श्वापदे दाखवली. ती वेगवेगळ्या राष्ट्रांची सूचक खुणा अशी होती.[१२] तिने एक मोठा पंख असलेला साप पाहिला. पवित्र शास्त्रात हे सैतानाचे चिन्ह आहे.[१३] या सापाने सर्व श्वापदांना (राष्ट्रांना) गिळून टाकले.[१४] ती सर्व त्याच्यामध्ये होती.[१५] आज आपण जगामध्ये एकच जागतिक सरकार पाहतो त्याचेच हे प्रतीक आहे.

पाच वर्षांच्या छोट्या मुलीला दानीएलाचे पुस्तक, प्रकटीकरणाचे पुस्तक, दुसरे थेस्सल. ही पुस्तके कोठून माहीत असणार, आणि देवाच्या या गूढ रहस्यांचे ज्ञान तरी कसे असणार - पण आज मात्र ही रहस्ये उघड झाली असून ती लक्षावधी लोकांना माहीत झाली आहेत. पण एक लक्षात घ्या. सुझनने हा दृष्टान्त १९३० या वर्षी पाहिला, तेव्हा ती फक्त पाच वर्षांची होती. पुढे चौतीस वर्षांनंतर, १९६४ मध्ये, माझे तारण झाले[१६] आणि देवाकडून प्राप्त झालेल्या दृष्टान्तांना अनुसरून आम्ही पतिपत्नी म्हणून संयुक्त झालो. आणि आम्ही दोघांनी मिळून संपूर्ण जगाला सुवार्तेचा संदेश दिला. आणि १९८२ मध्ये सुझन देवाघरी गेली, तेव्हापासून ख्रिस्ताच्या पाचारणाचे कर्तव्य करण्यास मी कसूर केली नाही. तर तिच्या मरणापूर्वी करीत होतो त्याहून अधिक प्रमाणात मी सुवार्ता सांगतोच आहे.

ख्रिस्त, ख्रिस्ताचे सेवक, संदेष्टे, प्रेषित आणि शिष्य यांच्यासारखाच[१७] आमचाही छळ होत असताना माझी मंडळी आणि मी अद्याप खचून न जाता आवेशाने, चिकाटीने, नेटाने, संघर्ष करीत देवाचा संदेश जगातील लोकांना का सांगत राहतो हे जगातल्या लोकांना समजणार नाही.

---

७. इफिस. १:७; २:१,८; कलस्सै. १:१४; २:१३-१५; योहान. ३:१६; ११:२५,५०; १८:१४; १ थेस्सल. ५:९-१०; यशया ५३:४-८; ५३:१०-१२; १पेत्र. ३:१८; ८. मत्तय. २४:१३; १करिंथ. ९:२४; २तीमथ्य. ४:७; फिलिप्पै. ३:१४; **९.** १करिंथ. १५:२२,४५; रोम. ३:२३; ५:१२,१४; **१०.** प्रकटी. १९:१३; **११.** प्रकटी. ४:३; **१२.** दानी. ७:२-७; प्रकटी. १३:२; **१३.** प्रकटी. १२:३-४,९; २०:२; **१४.** दानी. ७:७; मत्तय. अ. २४; २ थेस्सल. २:७-१०; प्रकटी. १३:२; **१५.** प्रकटी. १२:९; १३:३-४; ७-८; २०:८; **१६.** टोनी ॲलामो यांची साक्ष-पत्रिका 'शुष्क अस्थी' पाहा. **१७.** मत्तय. ५:१२; २३:३४; लूक. ११:४७

आम्ही योद्धे म्हणून लढत राहतो. कारण जो देवाचा शब्द आहे, देव आहे[१८] त्या ख्रिस्ताने प्रत्येक संदेष्ट्याला, प्रत्येक प्रेषिताला आणि प्रत्येक शिष्याला आज्ञा दिली होती तीच जगातील प्रत्येक राष्ट्रातील प्रत्येक माणसाला सुवार्ता सांगण्याची[१९] अगर नरकात जाण्याची[२०] आज्ञा प्रत्येक ख्रिस्ती व्यक्तीला दिली आहे. आणि ही प्रत्यक्ष देवाची आज्ञा नसती, आणि प्रत्येकाला सुवार्ता न सांगितल्याबद्दल मला नरकात जावे लागले नसते, तर मी जगासाठी माझा एका क्षणाचाही वेळ दिला नसता.[२१]

हव्वाच्या द्वारे पापाने जगामध्ये प्रवेश केला तेव्हाच देवाने जगाचे सर्वकाळ रक्षण करण्याचा आपला आशीर्वाद काढून घेतला.[२२] आणि पाप या कारणामुळे जगातील प्रत्येक गोष्ट झिजते, क्षय पावते आणि मरते.[२३] आणि जगाची योग्य प्रकारे सात्त्विकपणे, खरेपणे निगा राखली नाही तर हा परिणाम जलद होतो.[२४]

देवाने आमचा आत्मा आणि आमचे तारण यांची अशी जडणघडण केली आहे की त्याचा धाक धरून त्याजवर कोण प्रीती करते हे त्याला समजावे म्हणून तो आमच्यामधील त्याचे सामर्थ्य दररोज क्षीण होऊ देतो. म्हणूनच आपण ते सामर्थ्य आमच्यात टिकून राहावे यासाठी आमच्या पूर्ण अंतःकरणाने, आत्म्याने, जिवेभावे, मनाने आणि शक्तीने त्याच्या मागे राहिले पाहिजे.[२५] देवाने सुज्ञपणाने ही सर्व व्यवस्था अशीच केली आहे. यामुळे स्वर्गात प्रवेश दिलेल्यांमधून त्याला तूसभूस निवडून बाजूला काढून टाकता येते.[२६] शाश्वत टिकाऊपणा फक्त स्वर्गामध्येच आहे, ते ज्यांना हवे असेल त्यांनी या जगामध्ये असताना देवाच्या वचनात दाखवल्याप्रमाणे आपल्या आत्म्यांची निगा राखावी म्हणजे त्यांना त्याच्या सुखलोकात प्रवेश करता येईल. तेथे कधीच काही क्षय पावत नाही अगर मरत नाही.[२७] मीही माझा आत्मा याच प्रकारे या संघर्षात, युद्धात अजिंक्य, अभेद्य राखतो.[२८] देवाने ही आज्ञा सर्वच ख्रिस्ती लोकांना दिलेली आहे.[२९]

**१८.** योहान.१:१; प्रकटी.१९:१३; **१९.** मार्क.१६:१५-१६; मत्तय.९:३८; ५:१४-१६; २५:४०-४३; लूक.१०:१; १४:२३; रोम.१०:१४-१५; २ करिंथ.९:६; योहान.३:१७; १ करिंथ.१:२१; ९:१६; प्रे.कृ.२०:२८; २ तीमथ्य.४:५; **२०.** १ करिंथ.९:१६,२७; २ करिंथ.५:११; यहे.३:१८-१९; मत्तय.३:१०, ७:१८-१९; लूक.१९:२०-२७; योहान. १५:१-२,६; २ थेस्सल.२:१०; इब्री.१०:२८-२९; याकोब.२:१३; **२१.** १ करिंथ.९:१६; १५:३२; **२२.** उत्पत्ति ३:१६-१९; ४:११-१२; ६:१७; **२३.** ईयोब ३४:१५; स्तोत्र.१०२:२६; १०३:१५-१६; यशया ४०:७,८; इब्री.१:११-१२; याकोब.१:१०-११; १ पेत्र.१:२४; प्रकटी.२१:१; **२४.** मत्तय.५:६; नीति.२७:२७; स्तोत्र.१०४:१४; इब्री.६:७; **२५.** २ पेत्र.२:२०,२१; इब्री.३:१२; २ तीमथ्य.२:१२; प्रकटी.३:२-३; २:२१-२२; १ करिंथ.१०:१-१२; प्रकटी.२:४-५; लूक. ११:२१-२३; ९:६२; इब्री.१२:१५; २योहान. १:९; योहान.१५:६; मार्क.४:३-९; १४:२०; १ इति. २८:९; २ इति.१५:२; यशया ५५:६; मत्तय.५:१३; २४:१२; याकोब.४:८; १ शमु.१५:११; प्रकटी.२१:८; इब्री.६:४-६; १०:२६-२९; **२६.** रोम.१४:२३; दानी.१२:२; २ करिंथ.५:१०; उपदेशक १२:१४; स्तोत्र.१:४; मत्तय.३:१२; २५:३१-३४,४१; मार्क.१६:१६; योहान.८:३५; १०:२७,२८; गलती.६:७-८; **२७.** योहान.अ.१५; १४:२३; मत्तय.१६:२४; रोम.८:३७; २थेस्सल.२:१०; २तीमथ्य.२:३; १योहान. २:२८; ४:४; 'बेसी' नावाची पत्रिका मागवा. **२८.** मत्तय.१०:१,७-८; लूक.१०:१९; योहान.१:१२; रोम.८:३७,३१; १करिंथ.१०:१३; फिलिप्पै.४:१३; १योहान.४:४; ५:४; **२९.** मत्तय.५:५-७,११,२८, २९,१६-२४; निर्गम २०:१२-१७; अनु.१०:१२,२०; १३:४; यहो.२४:१५; उपदे.१२:१३; रोम.१५:१६-१७; १करिंथ.२:२

पवित्रतेने चालल्याने सैतानाला आणि जगाला चीड येते.[३०] आणि आम्ही आमच्या कृपेचा म्हणजे देवामध्ये आमचे सामर्थ्य - त्याचा उपयोग करतो, तेव्हा भ्रष्ट हृदयाला टोचण्या लागतात आणि त्यातील सुप्त युद्ध उफाळून येते.[३१]

डिसेंबर १९९५ मध्ये मी लिहिलेल्या 'द सर्व्हंट ऑफ द लॉर्ड' या पुस्तकामध्ये मी आणि सुझन आम्ही दोघांनीही पाहिलेल्या दृष्टान्तांचे वर्णन केले आहे. देवाच्या ज्या दृष्टान्तांच्या द्वारे सुझन आणि मला पतिपत्नी म्हणून एकत्र केले तेच हे दृष्टान्त होते.[३२] गेली बत्तीस वर्षे मी पवित्र शास्त्राचा अभ्यास केला आहे आणि सुझन व मी यांना विवाहाने पतिपत्नी म्हणून ज्या अलौकिक प्रकारे एकत्र केले तसे दुसरे उदाहरण माझ्या पाहण्यात आणि ऐकण्यात नाहीच.

आदाम आणि हव्वा ह्यांनाही खरोखरी दिव्य, अलौकिक रीतीने संयुक्त केले होते.[३३] पण देवाने मला आणि सुझनला एकत्र केले तेव्हापासून ते अलौकिकपण उरलेले नाही. हव्वा आणि आदाम ही दोघेजण प्रत्येकाच्या, ख्रिस्ताच्याही मरणास कारण झाली आहेत.[३४] परंतु ख्रिस्त मेलेल्यांतून उठला आणि सदोदित जिवंत आहे.[३५] देवाने सुझनचा आणि माझा ख्रिस्तासाठी आत्मे जिंकण्याच्या महान संजीवनकार्यात अपरंपार प्रकारे उपयोग करून घेतला. आजवर एवढे मोठे संजीवन झाल्याचे कोणाला आठवत नाही. कदाचित जगाच्या आरंभापासून एवढे महान कार्य झाले नसेल. आम्ही ख्रिस्ताची ही सुवार्ता सांगतो आणि सांगत आहोत तीच एकमेव सुवार्ता आहे, आणि जे आध्यात्मिक दृष्टीने मृत आहेत अगर शारीरिक दृष्ट्या जीवनाला मेले आहेत, त्यांना जिवंत करण्याचे सामर्थ्य तिच्या ठायी आहे.[३६]

गेल्या अनेक वर्षांपासून आमच्या मंडळ्यांमध्ये ज्या चांगल्या आणि अलौकिक घटना घडत आहेत, त्यांच्या बातम्या प्रसारमाध्यमे देत नाहीत आणि प्रचलित न्यायव्यवस्थेनुसार मला त्यांच्याविषयी साक्ष देण्यासही मुभा नाही. याच कारणाने मी त्या घटनांचा वृत्तान्त देण्याची धडपड करतो. शासनव्यवस्था आणि प्रसारमाध्यमे आपली सर्व शक्ती वेचून पुढीलसारख्या घटनांचा वृत्तान्त देण्याचे कामी मला सर्वतोपरी अडवण्याचा प्रयत्न करतात. या घटना अशा : कॅलिफोर्निया, कॅनिअन कंट्री येथे सिएरा हायवेवर आमच्या मंडळीची जमीन आहे. तेथे एका फिरत्या घराची दुरुस्ती करताना एक माणूस मेला तो पुन्हा जिवंत झाला. त्याला देवाने पुन्हा जिवंत करावे यासाठी मी प्रार्थना केली. देवाने माझी विनंती ऐकली आणि त्याला मेलेल्यांतून उठविले. त्या क्षणापासून तो पूर्णपणे निरोगी झाला. देवाकडून झालेला हा दिव्य अलौकिक चमत्कार अनेकांनी प्रत्यक्ष पाहिला आहे आणि त्यावरून हेच सिद्ध झाले आहे की देवाचे सामर्थ्य आज आहे तसेच गतकाळात होते आणि भविष्यकाळातही असेल.[३७] पवित्र शास्त्र लिहिले गेले त्या काळात देव आपल्या संदेष्ट्यांच्या प्रार्थना, विनवण्या ऐकून त्यांना उत्तर देत

**३०.** गलती.६:१४; १करिंथ.१:१८; प्रकटी.१२:१२,१७; योहान.१:५,१५,१८-१९; १७:१४; प्रे.कृ.६:८-१३; ७:५४-६०; ९:१-५,८-९; १पेत्र.२:७-८; २तीमथ्य.३:१२; मत्तय.१७:२५-२६; **३१.** १करिंथ. १:१८; प्रकटी.१३:५-७; १९:११; प्रे.कृ.४:१६-१७; १६:१९-२४; मत्तय.५:४; लूक.९:२३; मार्क. ४:१७; **३२.** 'द सर्व्हंट ऑफ द लॉर्ड' ही पत्रिका मागवून घ्या. **३३.** उत्पत्ति २:२१-२२; **३४.** उत्पत्ति २:१७; ३:६,१९; रोम.५:१४,१७; १करिंथ.१५:२२; **३५.** प्रकटी.१:१८; मत्तय.२८:७-१०; प्रे.कृ.१:२,३; १करिंथ.१५:३-६; **३६.** योहान.६:५३-५७; १०:१; ११:२५; १४:६; प्रे.कृ.४:१२; प्रकटी.१:८; १९:१३; **३७.** इब्री.१३:८, मलाखी ३:६; गणना २३:१९

असे, तसेच तो आजही त्याच्या मुलांच्या प्रार्थना ऐकतो व त्यांना उत्तरे देतो हेच या महान चमत्कारावरून स्पष्टपणे दिसून येते.[३८]

योहान.९:३१ मध्ये सांगितले आहे : ''आपल्याला ठाऊक आहे की, देव पापी लोकांचे ऐकत नाही.'' देव या लोकांचे ऐकणार नाही. किंवा त्यांना उत्तरही देणार नाही. व्यभिचारी, जारकर्मी, अगम्य गमन करणारे, खुनी, वामपंथी, गुन्हेगार, करबुडवे, लबाड, चोर, लोभी, गैरफायदा घेणारे, नासधूस करणारे, दुसऱ्यांच्या मनावर नियंत्रण ठेवणारे, माणसांचा मेंदू अधीन करून घेणारे, गुलामांच्या छावणीवरचे अधिकारी, फसवणारे, खोटे संदेष्टे, भोंदू, तस्करी करणारे, आर्थिक फसवणूक करणारे, ख्रिस्ती माणसांचा व इतर कोणाचाही छळ करणारे, अन्यायी न्यायाधीश, दुसऱ्यांच्या विरुद्ध खोटी साक्ष देणारे, यहूदासारखे विश्वासघातकी, आणि इतर सर्व प्रकारे दुष्टपणे, अनीतीने वागणारे, कसलाही विधिनिषेध न ठेवणारे स्वार्थी लोक - अशांचे देव ऐकत नाही. आमच्या अंगी वरीलपैकी एखादा जरी दुर्गुण असता अगर पुढे मागे येण्याची शक्यता असती, तर देवाने मला किंवा सुझनला अखेरच्या काळातील आपल्या संपूर्ण कार्याची जबाबदारी, नेतृत्व आमच्यावर कधीतरी सोपवून दिले असते का?[३९]

देवाच्या सर्व भाकितांपैकी अखेरचे भाकीत लवकरच पूर्ण होईल.[४०] अनीतीचे रहस्य[४१] आणि देवाचे रहस्य लवकरच सर्वांना, प्रत्येकाला पूर्णपणे प्रकट होईल.[४२] ''पाहा, तो (ख्रिस्त) मेघांसहित येतो, प्रत्येक डोळा त्याला पाहील, ज्यांनी त्याला भोसकिले तेही पाहतील.''[४३]

त्याला भेटण्यासाठी आताच तुमच्या आत्म्याची तयारी करा.[४४] लवकरच घडून येणाऱ्या या घटनेला सामोरे जाण्यास तयार असा. म्हणजे त्याच्या क्रोधापासून तुमची सुटका होईल. सत्य व नीतीचा न्याय हाच त्याचा क्रोध आहे.[४५] पुढील प्रार्थना म्हणा आणि आताच तुमच्या सर्वच्या सर्व पापांचा पश्चात्ताप करा.

**''माझ्या प्रभू, आणि माझ्या देवा, माझ्या आत्म्यावर, मज पाप्यावर दया कर. येशू ख्रिस्त जिवंत देवाचा पुत्र आहे असा माझा विश्वास आहे. माझ्या सर्व पापांची क्षमा व्हावी म्हणून वधस्तंभावर तो मरण पावला आणि त्याने आपले रक्त सांडले असा माझा विश्वास आहे. माझा विश्वास आहे की, देवाने पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने येशूला मेलेल्यांमधून उठवले, आणि या क्षणाला तो देवाच्या उजव्या हाताशी बसून माझ्या पापांची ही कबुली आणि ही प्रार्थना ऐकतो आहे. मी माझ्या अंतःकरणाचे दार उघडतो आणि हे प्रभू येशू माझ्या अंतःकरणात ये अशी मी तुला विनंती करतो. काल्वरीच्या वधस्तंभावर माझ्या जागी तू सांडलेल्या मोलवान रक्ताने माझी सर्व गलिच्छ पापे धुऊन टाक. प्रभू येशू, तू मला टाकणार नाहीस, माघारा पाठवणार नाहीस, तू माझ्या पातकांची क्षमा करशील आणि माझ्या आत्म्याचे तारण करशील, हे मला माहीत आहे. कारण तुझे वचन, पवित्र शास्त्र तसे सांगते. तू कोणालाही घालवून देणार नाहीस असे तुझे वचन सांगते; आणि त्यात माझाही समावेश**

**३८.** स्तोत्र.१०:१७;३४:१७; नीति.१५:२९; लूक.१८:७-८; योहान.९:३१; याकोब.५:१६; **३९.** १तीमथ्य.३:८-१३; तीत.१:७-९; १करिंथ.६:४-१०; **४०.** प्रकटी.१:३;२२:१०; **४१.** २ थेस्सल.२:७; **४२.** प्रकटी.१०:७; **४३.** प्रकटी.१:७; **४४.** आमोस ४:१२;२ करिंथ.६:२; **४५.** प्रकटी.१६:४-७; १८:२१-२४;१९:१-२

**आहेच. म्हणूनच माझी खात्री आहे की, तू माझी प्रार्थना ऐकली आहेस आणि मला उत्तर दिले आहेस हेही मी जाणतो. तसेच माझे तारण झाले आहे याचीही मला खातरी आहे. हे प्रभू येशू तू माझे तारण केलेस म्हणून मी तुझे उपकार मानतो आणि तुझ्या आज्ञेप्रमाणे मी सदोदित वागेन आणि यापुढे कधी पाप करणार नाही आणि मी सदोदित तुला धन्यवाद देईन.''**

आता तुमचे तारण झाले आहे. तुमच्या पापांची क्षमा झाली आहे म्हणून तुम्ही आपले दोन्ही हात उंच करा आणि प्रभूची स्तुती करा : ''आकाश हर्षो, पृथ्वी उल्लासो, राष्ट्रांमधल्या लोकांस विदित करा की परमेश्वर राज्य करतो.''[४६]

आता ख्रिस्त पवित्र आत्म्याच्या द्वारे तुमच्यामध्ये राहतो[४७] आणि तुमच्यामध्ये असलेल्या देवाच्या दिव्य स्वभावाचा आणखी अधिक वाटा प्राप्त करून घेण्याचा एक मार्ग आहे. देवपितादेखील तुमच्यामध्ये राहतो. देवाचा दिव्य स्वभाव तुमच्यामध्ये जेवढ्या जास्त प्रमाणात राहील तेवढ्या अधिक प्रमाणात तुमच्यावर येणाऱ्या मोहांना तुम्हांला ठामपणे विरोध करता येईल. या मोहांमुळे लक्षावधी ख्रिस्ती लोक आपल्या तारणाला मुकले आहेत. याला कारण एकच, ते म्हणजे आमच्यामध्ये देवाचे प्राबल्य असण्याऐवजी माणसाचेच वर्चस्व अधिक झालेले असते. आज मानवजात एवढी दुष्ट झाली आहे की, सैतान आणि त्याची भुतावळ यांचे निर्मूलन केले तर आम्हीच आमचे सैतान होऊ, त्यात उणे पडणार नाही!

आता तुमचे तारण झाले आहे म्हणून पवित्र आत्म्याने बाप्तिस्मा व्हावा यासाठी प्रार्थना करा. देवाच्या वचनाचा प्रार्थनापूर्वक अभ्यास करा आणि दिव्य स्वभावाचा अधिकाधिक वाटा मिळावा यासाठी प्रार्थना करा.[४८] पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा आणि देवाचा पवित्र स्वभाव हे कसे प्राप्त करावे यासाठी आमचे मार्गदर्शनपर साहित्य मागवून घ्या, अगर आम्हांला फोन करा. कारण पवित्रतेवाचून कोणालाही देवाला पाहता येणार नाही.[४९]

आता तुमचे तारण झाले आहे तेव्हा या आज्ञेचे पालन करा. पित्याच्या नावाने आणि पुत्राच्या नावाने आणि पवित्र आत्म्याच्या नावाने पाण्यामध्ये संपूर्ण बुडी मारून बाप्तिस्मा घ्या.[५०] देवाच्या सर्व आज्ञांचे पालन करा आणि जिवंत राहा.[५१]

**टोनी ॲलामो, वर्ल्ड पास्टर**
**होली ॲलामो ख्रिश्चन चर्च,**
**पो. ऑ. बॉक्स ३९८, ॲल्मा, ॲर्केन्सास, ७२९२१, यु. एस. ए.**
**००१ (५०१) ७८२-७३७० किंवा फॅक्स (५०१) ७८२-७४०६**
**इंटरनेट वेब पेज http://www.clipboard.com/alamo/**

**४६.** १ इति.१६:३१; **४७.** रोम.८:११; **४८.** २ तीमथ्य.२:१५,२१; लूक.२१:३६; योहान.१५:३; **४९.** इब्री.१२:१४; **५०.** मत्तय.२८:१९; **५१.** अनु.८:१;३०:१६; नीति.४:४; ७:२

अधिक माहिती अगर मार्गदर्शन मिळवण्यासाठी पुढील पत्त्यावर पत्र पाठवा.

*ॲलामो ख्रिश्चन मिनिस्ट्रीज*
*पो. ऑ. बॉक्स १२६*
*हैद्राबाद, ए. पी. ५०० ००१, भारत*

पास्टर ॲलामो ह्यांनी अनेक नवी पुस्तके प्रकाशित केली आहेत. तुम्हांला ती हवी असल्यास मागवून घ्या. ती विनामूल्य मिळतील. पास्टर ॲलामो ह्यांचे *'मशीहा'* हे छोटे पुस्तक विनामूल्य मिळेल. यात मशीहासंबंधीची जुन्या करारातील ३३३ भविष्ये दिली आहेत. पास्टर ॲलामो ह्यांच्या अनेक प्रवचनांच्या ध्वनिफिती उपलब्ध आहेत.

हे साहित्य इतर भाषांत भाषांतर करून छापा आणि जगातील प्रत्येक देशातील प्रत्येक व्यक्तीला द्या. आमची परवानगी आहे. ''मग त्याने त्यांना सांगितले की सर्व जगात जाऊन संपूर्ण सृष्टीला सुवार्तेची घोषणा करा.''[५२] हे साहित्य कोणत्याही भाषेत पुन्हा छापताना या साहित्याचे हक्क व नोंदणी याविषयीचा पुढील मजकूर न चुकता छापावा :

© कॉपीराईट जानेवारी, १९९६, सर्व हक्क स्वाधीन
वर्ल्ड पास्टर टोनी ॲलामो ® पंजीकृत १९९५
ही पत्रिका ऑक्टोबर १९९५ मध्ये तुरुंगात असताना लिहिली आहे. ख्रिस्तासाठी तुरुंगवास पत्करणे ही पास्टर ॲलामो ह्यांना मोठ्या आनंदाची गोष्ट वाटते.

तारणाची एकमेव योजना फक्त या पत्रिकेतच दिली आहे.
कृपया ही पत्रिका टाकू नका, फेकू नका. ती दुसऱ्या कोणाला तरी द्या.

५२. मार्क.१६:१५